# पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर

:: चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र ::

Date 05/07/2025



: 07172-264300 : 07172-255800 : 7447744100 (PRO)


## अवैध देशी-विदेशी दारु वाहतुक करणाऱ्यांविरुध्द २ इसमांविरुध्द कारवाई
## देशी-विदेशी दारु साठा व चारचाकी वाहनासह
## एकुण ४,०९,६००/- रुपयाचा मुददेमाल जप्त
## पोलीस स्टेशन गोंडपिपरी ची कामगिरी

दिनांक ५ जुलै, २०२५ रोजी मिळालेल्या गोपनिय माहितीवरुन गोंडपिपरी पोलीसांनी शिवाजी चौक गोंडपिपरी येथे नाकाबंदी करुन एक स्विफ्ट डिझायर कार क्र. MH47-C-9684 ला थांबवून पंचासमक्ष सदर वाहनाची तपासणी केली असता त्यात अवैध रित्या देशी विदेशी दारु साठा मिळुन आल्याने सदर प्रकरणी पो.स्टे. गोंडपिपरी कलम ६५ (अ) (इ), ८३ महाराष्ट्र दारुबंदी कायदान्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता.

सदर गुन्हयात आरोपी वाहन चालक नामे (१) उमेश विश्वनाथ राजन हिरे वय ३६ वर्ष रा. तुकूम चंद्रपूर आणि (२) किसन धोंडोजी चौधरी वय ५५ वर्ष रा.जुनोना रोड चंद्रपूर याचे ताब्यातील वाहनामधील अवैध दारु साठा (१) देशी दारु रॉकेट संत्रा च्या २ पेटया किं.७,०००/- रु. (२) बिअर haywards 5000 च्या २० नग किं.२६००/- रु. (३) स्विफ्ट डिझायर कार क्र. MH47-C-9684 किं.४,००,०००/- रु. असा एकुण ४,०९,६००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन पुढील तपास गोंडपिपरी पोलीस करीत आहेत.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी श्री सुधाकर यादव यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि श्री रमेश हत्तीगोटे यांचे नेतृत्वात पोउपनि श्री कराडे, पोअं. तिरुपती, कडुकर, गव्हारे व सैनिक रियाज, दुर्योधन सर्व पो.स्टे. गोंडपिपरी यांनी केली आहे.

# पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर

:: चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र ::

Date 05/07/2025


: 07172-264300 : 07172-255800 : 7447744100 (PRO)


## जिल्हयातील तीन घरफोडीचे गुन्हे आणि एक मोटार सायकल चोरीचा गुन्हा उघड... २ आरोपी अटक

# १,९३,४००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त

## स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर ची कामगिरी

दिनांक ५ जुलै, २०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर चे पथक जिल्हयात गुन्हेगार शोध मोहीम व पेट्रोलींग करीत असतांना रेकॉर्ड वरील गुन्हेगार नामे (१) अतुल उर्फ मुजोर विकास राणा वय २६ वर्ष रा. भगतसिंग वार्ड बंगाली कॅम्प चंद्रपूर आणि (२) ऋषेश उर्फ क्रोब्रा चंद्रभान आत्राम वय २४ वर्ष रा. विसापूर यांनी बल्लारपूर पोस्टे हद्दीत घरफोडी केल्याची खात्रीशिर माहिती मिळाल्याने सदर दोन्ही गुन्हेगारांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी पोस्टे बल्लारपूर व रामनगर हद्दीत घरफोडीचे तीन गुन्हे आणि राजुरा हद्दीत एक मोटार सायकल चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिल्याने त्यांच्या कडुन चोरीच्या गुन्हयातील खालील मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

- पो.स्टे. बल्लारपूर अप.क्र.४६३/२०२५ कलम ३०५(ए), ३३१(४) भारतीय न्याय संहिता मधील सोन्याचे मंगळसुत्र, सोन्याची एक चैन, सोन्याची दोन आंगठी, चोरीस गेलेला रेडमी कंपनीचा मोबाईल, रोख ४००/- असा एकुण १५३,४००/- रुपयाचा मुद्देमाल
- पो.स्टे.राजुरा अप.क्र. ३११/२०२५ कलम कलम ३०३(), ३३१(४) भारतीय न्याय संहिता मधील एक होंडा शाईन मोटार सायकल क्र.**MH34X5159** किं.४०,०००/- रु.
- पो.स्टे.रामनगर अप.क्र. ४८४/२०२५ आणि ५७०/२०२४ कलम ३०५(ए), ३३१(३) भारतीय न्याय संहिता

असा एकुण १,९३,४००/- रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात येवुन आरोपींना बल्लारपूर पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक श्री ईश्वर कातकडे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अमोल काचोरे यांचे नेतृत्वात सपोनि श्री दिपक कांक्रेडवार, सपोनि श्री बलराम झाडोकर, पोउपनि संतोष निंबोरकर, पोउपनि सर्वेश बेलसरे, पोहवा जयसिंह, गणेश मोहुर्ले, नापोअं संतोष येलपुलवार, पोअं नितीन रायपुरे, मिलींद जांभुळे सर्व स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर यांनी केली आहे.